# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र. ३७०/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—०१/०७/२०१६.

**१) जिल्हा परीषद शाळेतुन क्रिडा सामानाची चोरी :—**

दिनांक २९/०६/०१६ रोजी १८.०० वा. ते दि. ३०/०६/२०१६ रोजी १४.०० वा. दरम्यान फिर्यादी गोपाल जयराम लांजेवार वय ४४ रा. किसान नगर खात रोड भंडारा शिक्षक हे त्यांच्या जि.प. हायस्कुल वरठी शाळेत नेहमी प्रमाणे आले. शाळेला जिल्हाधिकारी कार्यालय भंडारा यांचे कडुन मिळालेले क्रिकेटचे सामान किट थ्रोबॉल व साहीत्य कि. ५०००/—रु. चा माल क्रिडा खोलीत ठेवला होता. कोणीतरी अज्ञात चोराने क्रिडा खोलीच्या दाराचा कुलुप तोडुन आत प्रवेश करून तो माल चोरून नेला. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. राऊत पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

**२) घरातुन सोन्या चांदीच्या दागीन्यांची चोरी. :—**

दिनांक ३०/०६/०१६ रोजी ०१.५० वा. दरम्यान कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादी चिरंजीव पुनमचंद रहांगडाले वय ३० वर्ष, रा. गोवर्धन नगर तुमसर यांच्या घराच्या मागच्या दाराजवळील खिडकीतुन हात घालुन कोंढा काढला व आत प्रवेश करुन गोदरेज आलमारीत ठेवलेल्या सोन्याच्या बि—या ३ ग्रॅम, सोन्याचा गोप वजन २ ग्रॅम, १ लहान चांदीची लक्ष्मीची मुर्ती व नगदी १५,०००/—रु. असा एकुण कि. २२,५००/—रु. चा माल चोरुन नेला. असे फिर्यादीचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५७,३८० भादंवी अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. श्रीवास पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

**३) मोटार पंपची चोरी. :—**

दिनांक २६/०६/०१६ ते दि. २७/०६/०१६ रोजी रात्र दरम्यान आनंदाबाई विद्यालय किटाळी येथे विहीरीवर पाणी पुरवठा करण्यासाठी लावलेली सीआरएफ कंपनीची १ एच.पी ची मोटार पंप कि ७०००/—रू ची कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेली. असे फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेसन पालांदुर येथे कलम ३७९ भादवी अन्वये दाखल करण्यात आला तपास पोहवा राऊत हे करीत आहेत

**४) मोटार वाहन कायद्याखाली कारवाई. :—**

दिनांक ३०/०६/२०१६ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी वाहतुक करणा—यांवर ०६ केसस, तिन सिटर वाहनांवरती २० केसेस व इतर वाहनांवरती १०४ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(के.एच.धात्रक)
प्रभारी. पोलीस उपअधिक्षक(गृह)
भंडारा.
दुरध्वनी.क्र. ९८२३६३७२२०

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.